http://www.sgbauonline.com/



# M.A. (Part—I) (Semester—I) Examination

## MARATHI

## Paper—1

## (Marathi Wangmayachi Sanskritic Parshwabhumi)

## (आरंभ ते 1818)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

सूचना :—(1) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिल्यास मूल्यांकनासाठी पहिले उत्तर ग्राह्य धरण्यात येईल.

1. 'साहित्य हे सामाजिक घटना-घटितांचे प्रतिबिंब असते' — या विधानाचा आशय उलगडून दाखवा.

**किंवा**

संत एकनाथांच्या सामाजिक व वाङ्मयीन कार्याची फलश्रुती विशद करा.

2. 'महानुभाव साहित्य म्हणजे तत्कालीन सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाला दिलेले उत्तर होय.' — विधानाची चर्चा करा.

**किंवा**

महानुभाव पंथाच्या वाङ्मयीन कार्याचे मूल्यमापन करा.

3. वारकरी संप्रदायातील नामदेवांच्या मांदियाळीतील इतर संतमंडळींच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घ्या.

**किंवा**

वारकरी संप्रदायाच्या सामाजिक फलश्रुतीची चर्चा करा.

4. लावणी वाङ्मयाच्या अधोगतीची कारणे विशद करा.

**किंवा**

संत तुकारामाच्या अभंगामधून शिवकालीन समाजस्थितीचे चित्रण कसे झाले आहे ? — सोदाहरण लिहा.

5. खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा :

(1) साहित्य हे समाजाची _______ गरज असते.

(अ) आर्थिक (ब) धार्मिक

(क) सांस्कृतिक (ड) भौगोलिक

(2) 'चतुर्वर्गचिंतामणी' हा ग्रंथ कोणाचा आहे ?

(अ) रामदेव यादव (ब) हेमांद्री पंडित

(क) वामन पंडित (ड) कृष्णदेव यादव

(3) 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लाऊ जगी' — ही रचना कोणाची ?

(अ) संत एकनाथ (ब) संत ज्ञानेश्वर

(क) संत नामदेव (ड) संत तुकाराम



http://www.sgbauonline.com/

(4) खालीलपैकी कोणता ग्रंथ संत ज्ञानेश्वर यांचा नाही ?

(अ) भावार्थदीपिका (ब) स्मृतिस्थळ

(क) चांगदेव पासष्टी (ड) अमृतानुभव

(5) वारकरी संतांपैकी कोणी तीर्थावळीचे अभंग लिहिले ?

(अ) संत चोखामेळा (ब) संत सोयराबाई

(क) संत नामदेव (ड) संत एकनाथ

(6) संत एकनाथ यांचा जन्म कोणत्या गावी झाला ?

(अ) पैठण (ब) नेवासा

(क) आळंदी (ड) देहू

(7) देहू-आळंदी कोणत्या नदीच्या काठावर आहे ?

(अ) चंद्रभागा (ब) भिमा

(क) गोदावरी (ड) इंद्रायणी

(8) वीर पुरुषांच्या पराक्रमाची व लढायांची वर्णने कोणत्या काव्यप्रकारात समाविष्ट असतात ?

(अ) गौळण (ब) भारूड

(क) लावणी (ड) पोवाडा



http://www.sgbauonline.com/